MHAU080015522026

## निशाणी क्र. १ खालील अर्ज

अर्जदार शेख युसूफ शेख लुखमान यांनी अपराध क्रमांक ९७/२०२६ मध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल रक्कम रूपये ५०,०००/- अर्जदारास सुपूर्त करण्याकरिता भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये सदर अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

०२. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे पोलीस ठाणे, अजिंठा यांचे मार्फत नोंदविण्यात आलेल्या अपराध क्र. ९७/२०२६ मध्ये जप्त करण्यात आलेली रक्कम रूपये ५०,०००/- चा अर्जदार हा मालक असून सदर जप्त रक्कम पोलीस ठाण्यात पडून राहील्यास त्यांचे नुकसान होईल. करिता ते अर्जदाराचे सुपूर्त करण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे.

०३. सरकारी विधीज्ञ व तपासी अधिकारी यांनी सदर जप्त मुद्देमाल अर्जदाराच्या सुपूर्त करण्याबाबात पुढील आदेश होण्याची विनंती केली आहे. अर्जदार यांनी स्वतः चे आधार ओळखपत्राची प्रत व गुन्हा क्र. ९७/२०२६ च्या प्रथम खबर अहवालाची सत्यप्रत दाखल केलेली आहे. सदर जप्त रक्कम रूपये ५०,०००/- पोलीस ठाणे, अजिंठा येथे ठेवण्यात आलेले आहे. खटल्याचा निकाल लागेपर्यंत बराच वेळ लागणार आहे. अशा परिस्थितीत सदर मुद्देमाल पोलीस ठाणे, अजिंठा येथे विनाकारण पडून राहील्यास अर्जदाराचे नुकसान होईल. करिता सदर मुद्देमाल अर्जदारास सुपूर्त करणे योग्य होईल. परंतु सदर मुद्देमाल गुन्हयाच्या कामी जप्त करण्यात आलेले असल्याने ते अर्जदारास सुपुर्त करते वेळी त्याबाबत योग्य त्या अटी लादणे आवश्यक आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

# आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. अपराध क्र. ९७/२०२६ पोलीस ठाणे, अजिंठा मध्ये जप्त करण्यात आलेली रक्कम रूपये ५०,०००/– अर्जदार शेख युसूफ शेख लुखमान यांना रक्कम रूपये ५०,०००/– च्या बंधपत्रावर (इंडेम्नीटी बॉड) वर सुपूर्त करण्यात यावे.

०३. तपासी अधिकारी यांनी सदर जप्त रक्कम अर्जदार यांना देते वेळी जप्त चलनी नोटांचे क्रमांक नमूद करून पंचनामा तयार करावा.

०४. तपासी अधिकारी यांनी अर्जदार यांचे ओळख प्रमाणपत्र तपासूनच सदर जप्त रक्कम अर्जदार यांना द्यावी व जप्त रक्कम स्वीकारतानाचा फोटोग्राफ काढावा.

०५. तपासी अधिकारी यांना असे निर्देश देण्यात येते की, पंचनामा, जप्त रक्कम स्वीकारतानाचा एक फोटो व सदर आदेशाची एक प्रत बंधपत्र (इंडेम्नीटी बॉड) दोषारोपपत्रासह न्यायालयात दाखल करावी.

(ए.एच.तड्डु)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र. ३, सिल्लोड

दिनांकः २३.०७.२०२६